दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com | संपादक : अजय भांगे | https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • बुधवार दि.१४ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १४१ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Wednesday 14 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 141 • Pages 4 • Rate 4 Rs




# डिग्रीचे आमिष, करोडोंचा गिळंकृत घोट! अंतरराज्यीय ठक अखेर जेरबंद

## आयपीएस व्यंकटराम यांच्या पथकाने आवळल्या मुसक्या

### उप विभागीय पोलिस अधिकारी कार्यालय केज यांनी फसवणुकीच्या गुन्हयातील आरोपीस शिताफीने केली अटक

### पदवित्तर शिक्षणासाठी ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रु. घेऊन डॉक्टरांना फसविणारा अंतराजीय ठक पोलिसांच्या जाळ्यात

### महाराष्ट्रासह गुजरात, चंदिगढ, पंजाब आणि इतर राज्यात पंधरा पेक्षा जास्त गुन्हे असलेला ठक उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंकटराम यांच्या पथकाने घेतला ताब्यात

**वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टरांना उच्च व पदवित्तर शिक्षणासाठी प्रवेश मिळवून देण्याचे आमिष दाखवून महाराष्ट्रासह गुजरात, चंदिगढ, पंजाबसह इतर राज्यात पंधरा पेक्षा जास्त गुन्हे दाखल असलेला ठक उपविभागीय पोलिस अधिकारी व्यंकटराम यांच्या पथकाने कराड येथून ताब्यात घेतला आहे. त्याने आतापर्यंत सुमारे ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रु. घेऊन अनेक डॉक्टरांना फसविले आहे. मात्र केज उपविभागाचे सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकटराम यांच्या पथकाने त्याच्या मुसक्या आवळल्या आहेत.**

**आरोपी वरील उत्तर ठिकाणी दाखल असलेले गुन्हे**

१) सरकार वाडा नाशीक शहर गुरनं. ०९/२०१६
२) टेंभुणी सोलापुर ग्रामीण गुरनं. ६१७/२०१७
३) चंदनजिरा – जालना गुरनं. ४५९/२०२३ ४) घनसांगवी –जालना गुरनं. ५१४/२०२५ ५) धनतोली– नागपुर गुरनं. २०३/२०२५
६) खडकी– पुणे गुरनं. २८७/२०२५
७) दहीसर – मुंबई गुरनं.६७६/२०२४
८) विजापुर नाका– सोलापुर शहर
९) धनतोली –नागपुर शहर गुरनं. १७१/२०२२
१०) अमृतसर– राज्य–पंजाब गुरनं. ५३/२०२४
१२) जरी फटका–नागपुर शहर गुरनं. ७७१/२०२४
१२) तासगाव– सांगली गरनं. ४७६/२०२५ १३) हुडकेश्वर– नागपुर शहर गुरनं. ४९५/२०२४
१४) डेसा सीटी, बनास फाटा गुजरात गुरनं. २४५/२०२४
१५) धारुर जि.बीड गुरनं.४५३/२०२५ येथे देखील वरील प्रमाणे विविध प्रकारचे फसवणुकीचे गुन्हे केले



दैनिक वादळ वार्ता
**केज । गौतम बचुटे**

या बाबतची माहिती अशी की, वैद्यकीय अधिकारी डॉ.अविनाश रामचंद्र तोंडे हे बारामती येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून कार्यात असताना त्यांना एम डी या पदवित्तर उच्च वैद्यकीय शिक्षणासाठी एस. के. इज्युकेशन संस्था वरील फेसबुक अकाऊंटवरुन फिर्यादी अविनाश तोंडे यांची नागपुर येथील सौरभ सुहास कुलकर्णी रा. नागपुर याचे सोबत ओळख झाली. डॉ तोंडे यांना एमडी मेडीसीनसाठी मॅनेजमेंट कोटयातुन प्रवेश घ्यायचा असल्याने ते सौरभ कुलकर्णी याचे संपर्कात होते. सौरभ कुलकर्णी याने मॅनेजमेंट कोट्यातून एम डी साठी इमर्जन्सी या शाखेसाठी प्रवेश हवा असे म्हण्यावरून कुलकर्णी तीन वर्षाची फिश ही ९९ लाख रु. असल्याचे सांगितले. ती फी कमी करू ६५ लाख रु मध्ये जवाहलाल नेहरू मेडिकल कॉलेज येथे डमिशन करून देण्याचे त्याने सांगितले. या साठी त्याने डॉ तोंडे यांच्याकडून ८ लाख रु घेतले. परंतु त्यांचे कोणत्याही यादीत नाव नसल्याने डॉ तोंडे यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आहे. त्यावरून त्यांनी दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजी धारूर पोलिस ठाण्यात सौरभ कुलकर्णी याच्या विरुद्ध गु र न ३५४/२०२५ भा न्या सं ३१८(४) नुसार गुन्हा दाखल केला.

या प्रकरणी सहाय्यक पोलिस अधीक्षक व्यंकट राम यांनी तपास केला असता सदर आरोपी विरुद्ध महाराष्ट्र आणि राज्य बाहेर अनेक गुन्हे असल्याचे निदर्शनास आले. त्यावरुन गुन्हयाचा तपास जलद गतीने करुन आरोपीची गोपनिय, टेक्निकल नालिसिस सेल बीड व इतर माध्यमाद्वारे माहीती काढुन आरोपीचा ठावठिकाणा माहीती करुन घेवुन आरोपीस अटक करणे कामी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय केज येथील एक तपास पथक रवाना केले. आरोपी यास शिताफीने कराड जि. सातारा येथे आज दि.१३ जानेवारी रोजी ताब्यात घेण्यात आले आहे.सौरभ कुलकर्णी याने आता पर्यंत अनेकाना फसवून ३ कोटी ८६ लाख ६१ हजार रु. लाटले असल्याचे प्रथम दर्शनी आढळून आले आहे. यापेक्षा जास्त लोकांना त्याने फसविले असल्याचा अंदाज आहे.सदर कारवाई जिल्हा पोलिस अधिक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांचे मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस अधीक्षक वेंकटराम, पोलिस उपनिरीक्षक जावेद कराडकर, पोलिस उपनिरीक्षक अमिर ईनामदार, पोलिस नाईक अनिल मंदे आणि आरोपीला ताब्यात घेण्यासाठी त्यांना कराड येथील नागरिक महेश कुर्ले आणि अशोक कांबळे याच बरोबर महामार्ग पोलिस कर्मचारी मोहिते यांनी मदत केली.



**झाडे लावा झाडे जगवा**

# पुणे मनपा निवडणूक: पैसे वाटपाचा आरोप कठोर कारवाईची मागणी-डॉ नीलम गोऱ्हे



दैनिक वादळ वार्ता
**पुणे । अरविंद बनसोडे कुरनूरकर**

पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना नेत्या व विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी निवडणूक प्रक्रियेत पैसे वाटप, प्रशासनावर दबाव आणि अधिकाऱ्यांच्या संशयास्पद बदल्यांचे आरोप करत राज्य निवडणूक आयोगाचे लक्ष वेधले. अशा प्रकारांना वेळीच आळा घालण्यात आला नाही तर परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, मागील निवडणुकीत पैसे वाटप झालेले अधिकारी इतर ठिकाणीही तसेच प्रकार करत असल्याच्या तक्रारी आहेत. त्यामुळे गेल्या काही महिन्यांत बदली झालेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करून मतदान प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक ठेवावी. पोलिसांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता कठोर गस्त व कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली.

शिवसेना यंदाच्या निवडणुकीत आरोप-प्रत्यारोपांऐवजी विकासाला केंद्रस्थानी ठेवून मैदानात उतरली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुणे शहरासाठी आरोग्य, शिक्षण, पायाभूत सुविधा, पर्यटन विकास आणि समाविष्ट गावांतील करप्रश्न सोडवण्यावर भर देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

लाडकी बहीण योजनेमुळे कोट्यवधी महिलांना दिलासा मिळत असून, या योजनेला विरोध करणाऱ्यांना महिलांनी ओळखावे, असे आवाहनही त्यांनी केले. पुणे मनपा निवडणुकीत स्वच्छ कारभार व विकास हीच शिवसेनेची भूमिका असल्याचे डॉ. नीलम गोऱ्हे यांनी ठामपणे सांगितले.

## वादळी कट्टा

निवडणुका आल्या, भाषणांचा बाजार,
निवडणुका गेल्या, प्रश्नच झाले हजार।
मतदार राजा फक्त पोस्टरवर दिसतो,
मतदान झालं की तोच पुन्हा विसरला जातो।

घोषणांचा पाऊस, आश्वासनांची सर,
मत मागताना सगळेच येतात घराघर।
निकाल लागताच सगळेच झाले दूर,
फोनही म्हणतो आता नॉट रीचेबल हुजूर।

जात-पात जागी, धर्माची माळ,
मत मिळालं की संपतो सारा खेळ।
रस्ता, पाणी, रोजगार तसेच राहिले,
निवडणुका आल्या नि गेल्या प्रश्नच वाढले।

पाच वर्षांनी पुन्हा तेच दृश्य दिसते,
तेच चेहरे, तेच स्वप्न रंगविते।
कट्ट्यावर बसून जनता म्हणते हळूच,
यावेळी तरी बदल होईल का खरंच?



संपादक
अजय भांगे




# संपादकीय

## चला मतदान करूया!




निवडणुकांमध्ये काही मतांच्या फरकाने निकाल बदलले आहेत. एक मत म्हणजे एक आवाज. लाखो मतदारांचा मिळून तयार होणारा हा आवाजच शहराचे भविष्य ठरवतो. पालिका निवडणूक ही दैनंदिन आयुष्याशी थेट जोडलेली निवडणूक आहे. दैनंदिन निगडित प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनच सुटतात. म्हणूनच पालिका निवडणूक ही प्रत्येकाच्या घरातील सुखदुःखाची निवडणूक आहे.अखेर नऊ वर्षांनंतर का होईना तो दिवस आला. मुंबईकरांना आपला स्वतःचा प्रतिनिधी निवडण्याची वेळ आली. त्याद्वारे मुंबईचा महापौर हे प्रतिष्ठेचे स्थान निवडण्याची वेळ आली. न्यायालयाच्या आदेशाने वा इतर काही कारणांमुळे रखडलेल्या निवडणुका अखेर नऊ वर्षांनी का होईना होत आहेी. घटनेने दिलेल्या या स्वातंत्र्याचा आपण आता पुन्हा एक प्रकारे उत्सवच साजरा केला पाहिजे. मुंबईकरांना आपला स्वतःचा लोकप्रतिनिधी निवडण्याची वेळ आली. न्यायालयाच्या आदेशाने आता निवडणुका पार पडणार आहेत. त्यासाठी प्रत्येकाने गुरुवारी मतदान केले पाहिजे. आपल्यासाठी सुद्धा आणि येणाऱ्या भविष्यासाठी सुद्धा. अखेर सर्व अडथळे पार पाडून येत्या गुरुवारी मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुका होतील. तब्बल नऊ वर्षांनी होणाऱ्या या निवडणुका या केवळ निवडणुका नसून भविष्यासाठी आपण निवडलेला योग्य मार्ग असेल. बरीच मंडळी निवडणुका आल्या, की त्यावर बहिष्कार टाकण्याची तसेच आम्हाला काय त्यातले म्हणत निवडणुकीकडे पाठ फिरवतात. मात्र हे चुकीचे असून आपणच आपल्या प्रगतीच्या मार्गात अडथळे आणत आहोत हेही त्यांच्या लक्षात येत नाही. जर आपण मतदान केले नाही तर आपल्याला टीका करण्याचा कोणताही हक्क उरत नाही. काहीजण म्हणतात इतर नगरसेवकांची स्थानिक पातळीवरची निवडणूक आहे, मग त्यात काय एवढे; आमच्या एका मतदानाने इतका काय फरक पडतो? मात्र असा सर्वांनीच विचार केला तर मात्र चुकीच्या हाती सत्ता जाऊन त्याचे दुष्परिणामही आपल्यालाच भोगावे लागतील. ही स्थानिक पातळीवरचीच निवडणूक आपल्या शहराला आपण निवडून दिलेल्या उमेदवाराकडून चांगली कामे करून घेऊन आपले शहरच नव्हे, तर देश घडवण्यास आपण मदत करत असतो हेही लक्षात घ्यावयास हवे. ही निवडणूक नगरसेवकांसाठी आहे, तर आधी नगरसेवकाचं खरं महत्त्व पटवून घेतले पाहिजे.आपल्या रोजच्या आयुष्यात ज्या कामांशी आपला संबंध येतो त्या रस्ता, पाणी, वीज, कचरा, नाले, शाळा, दवाखाना, परिवहन सेवा ही सगळी कामं थेट नगरसेवकाच्या हातात असतात. आपल्या गल्लीतला खड्डा, बंद लाईट, भरलेली गटारं, कचऱ्याचा ढीग,बस सेवा हे सगळं नगरसेवकाकडेच जाते. आपल्या वॉर्डमध्ये काही चांगलं झालं, तर त्यामागे नगरसेवकाची धावपळ असते. काही बिघडलं, तर आपण पहिल्यांदा जाऊन जाब विचारतो तोही नगरसेवकालाच. म्हणजे तो आपला सगळ्यात जवळचा लोकप्रतिनिधी असतो. म्हणूनच पालिका निवडणूक फार महत्त्वाची आहे. आपण ज्याला मत देतो, तोच पुढची पाच वर्षं आपल्या भागाचं नशीब ठरवतो. चुकीचा माणूस निवडला, तर पाच वर्षं तक्रार करत बसावं लागतं. योग्य माणूस निवडला, तर आपला परिसर बदलून जातो. जो फोन उचलतो, लोकांना भेटतो, कामासाठी मागे लागतो, अधिकाऱ्यांकडे धावपळ करतो आणि प्रश्न सुटेपर्यंत शांत बसत नाही, असा नगरसेवक हवा. फक्त बॅनर लावणारा, भाषण देणारा, पण काम न करणारा नको. हेही लक्षात असू द्या. एकदा प्रचारासाठी आपल्या दारात आला आणि पाच वर्षे तो गायब झाला असाही नको, म्हणून योग्य त्या व्यक्तीची निवड ही खूप जरुरी म्हणूनच मतदानाच्या दिवशी आळस झटकून बाहेर पडा आणि योग्य त्या व्यक्तीला मत द्या. आपल्या विभागातील रस्ते पाणी, लाईट, कचरा, दवाखाना याची कमतरता व त्यांची परिस्थिती हे सगळं मत देताना आठवा. 'माझ्या घराजवळचं काम कोण करून देईल?' हा प्रश्न स्वतःला विचारा आणि मगच बटन दाबा. आपलं एक मत म्हणजे आपल्या वॉर्डचं भविष्य आहे. चुकीचं मत दिलं, किंवा मत दिलंच नाही, तर नंतर बोलायचा अधिकारही आपोआप कमी होतो. म्हणूनच पहिले मतदान, मग बाकी सगळी कामं!आपल्या वॉर्डसाठी, मुलांच्या भविष्यासाठी आणि रोजच्या सोयीसाठी नक्कीच मतदान करा. याचा खरा अर्थ फक्त भाषणांत, घोषणा देण्यात किंवा सोशल मीडियावर मत मांडण्यात नाही, तर प्रत्यक्ष मतदान केंद्रावर जाऊन मत नोंदवण्यात आहे. पालिका निवडणूक ही दैनंदिन आयुष्याशी थेट जोडलेली निवडणूक आहे. दैनंदिन निगडित प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातूनच सुटतात. म्हणूनच पालिका निवडणूक ही केवळ राजकारणाची नाही, तर घराघरातील सुखदुःखाची निवडणूक आहे. आज अनेकजण म्हणतात, 'माझ्या एका मताने काय फरक पडणार?' पण इतिहास सांगतो, की अनेक निवडणुकांमध्ये काही मतांच्या फरकाने निकाल बदलले आहेत. एक मत म्हणजे एक आवाज. लाखो मतदारांचा मिळून तयार होणारा हा आवाजच शहराचे भविष्य ठरवतो. मुंबई महानगरपालिकेची ही निवडणूक म्हणजे आपल्या देशाचे एक नाकच आहे, म्हणून येथे सत्ता असावी असे प्रत्येक पक्षाला वाटते. आपले शहर हा देशाचा मानबिंदू असतो. परदेशात येणारा प्रवासी हा मुंबई दिल्लीसारख्या शहरांवरूनच आपल्या देशाचे चित्र रंगवतात. ७४ हजार कोटी अर्थसंकल्प व ८० हजार कोटींच्या ठेवी असलेली व एका राज्याचा अर्थसंकल्प असणारी मुंबई महानगरपालिका यावर योग्य सत्ता असणे खूप महत्त्वाचे आहे. म्हणून आपण दिलेले लोकप्रतिनिधीही तेवढेच अभ्यासू व तोडीचे असणे आवश्यक आहे. म्हणून मुंबईकरांचे मतदान आवश्यक आहे. यंदाच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढीसाठी मुंबई महापालिका प्रशासन व राज्य निवडणूक आयोगाने जोरदार प्रयत्न सुरु केलेत. परंतु सन २०१२ च्या निवडणुकीत ४४.७५ टक्के मतदान झाले होते, तर २०१७ च्या निवडणुकीत ५५.५३ टक्के मतदान झाले होते. त्यामुळे सध्या होऊ घातलेल्या निवडणुकीत मतदानाचा टक्का वाढण्याचे पालिका व राज्य निवडणूक आयोगासमोर आव्हान असले तरी सच्चा मुंबईकरांसाठी ती भूषणावह बाब नक्कीच नाही. तरी यंदा ही परिस्थिती बदलेल अशी आशा करूया!

# माजलगाव संघाचे अजात शत्रु व्यक्तीमत्व; आ.प्रकाश दादा सोळंके



माजलगाव विधानसभा मतदार संघाच्या सर्वांगीण विकासाचे शिल्पकार, हरितक्रांतीचे प्रणेते आ.प्रकाश दादा सोळंके यांचा आज वाढदिवस आहे.त्यानिमित्त दोन शब्द. तब्बल चार दशकांपासून माजलगाव मतदार संघाच्या राजकारणात सक्रिय राहुन, येथील जनतेची अहोरात्र सेवा करणारे एकमेव नेतृत्व म्हणजे आ.प्रकाश दादा सोळंके हे आहेत. या ४० वर्षाच्या कारकीर्दीत मतदार संघात विविध पक्षाचे अनेक नेते आले आणि गेले.मात्र कधी विजय झाला तरी आणि कधी पराभव झाला तरीही माजलगाव मतदार संघ न सोडलेले एकमेव नेते आ.दादाच आहेत. राजकारणात अनेक राजकीय चढ-उतार येतात. त्यात तग धरून संयमाने राहणे खुपच अवश्यक असते.ही कला सर्वांनाच जमते असे नाही.मात्र या कलेत आ.दादा हे तावूनसुलाखून निघाले आहेत. त्यामुळेच ते एक दोन नव्हे तर तब्बल ४० वर्षांपासून याच मतदार संघात कायम टिकून तर आहेतच. शिवाय मतदार संघातील जनतेचे विश्वास पात्र नेतृत्व म्हणुन परिचित आहेत. आ.दादांचा राजकीय प्रवास जि.प.सदस्य, पंचायत समिती सभापती, आमदार, राज्यमंत्री असा आहे.हे सर्व राजकीय पदे भुषवत असताना त्यांनी कधीही गर्व केला नाही.की कधी जनतेशी उद्धटपणाचे वर्तन केले नाही.कायम संयमाची भुमिका घेत लोकांचे प्रश्न जाणून घेत आपले कार्य चालुच ठेवले.आ.दादा हे आमदार होण्यापूर्वी मतदार संघ विकासापासुन कोसो दुर होता.मतदार संघात ना दळणवळणाची सोय होती ना सिंचनाची सोय होती.अगदीच सांगायचे झाले तर मतदार संघातील जनतेला विकास काय असतो हेच माहिती नव्हते.मात्र दादा आमदार झाले आणि पहिल्या पाच वर्षांत मतदार संघातील गावागावात एक एक विकास कामे होऊ लागले.आ.दादांनी मतदार संघात प्रथम दळणवळण व सिंचनाची कामे प्राधान्याने मार्गी लावत मतदार संघात अनेक गावात सिंचनाची विविध कामे करून जमिनी ओलिताखाली आणल्या.तसेच गावोगावचे रस्ते राज्य व राष्ट्रीय महामार्गास जोडल्याने दळणवळण सोयीस्कर झाले. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांच्या.हाताला काम मिळु लागले.तसेच लोकनेते सुंदररावजी सोळंके साहेब यांनी मुहूर्तमेढ रोवलेल्या लोकनेते सोळंके साखर कारखान्याच्या माध्यमातुन ऊसउत्पादक शेतकऱ्यांच्या जीवनात आर्थिक प्रगती आणत त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी ऊसाला रास्त भाव दिला.याशिवाय आ.दादांचा समाजातील चौफेर प्रश्नांचा गाढ अभ्यास असल्याने ते प्रत्येक गावात कुठल्या विकास योजना हवी हे अचूक हेरून, त्या गावात तीच विकास योजना देतात. त्यामुळे तेथील लोकांचा त्यांच्या प्रति विश्वास वाढतच असतो.आ.दादांनी विकास कामात कधीही राजकारणाचा आडपडदा येऊ दिला नाही.विरोधकांच्या गावात ही ते मोठ्या प्रमाणात विकास निधी देतात. त्यामुळे विरोधकांकढे दादांच्या विरोधात कुठलाच ठोस मुद्दा कधीच नसतो.तसेच शेतकरी, कष्टकरी, शेतमजुर, मजुर या सर्वांच्या बाबतीत ही ते नेहमीच सकारात्मक प्रतिसाद देत असतात. तसेच मतदार संघात शिक्षणाचे विस्तारीकरण करण्यासाठी ही कायमच प्रयत्नशील असतात. आ.दादा हे मतदार संघातील एकमेव जनतेचे विश्वास पात्र नेतृत्व ठरले.त्यामुळेच ते तब्बल पाच वेळा मतदार संघाचे आमदार म्हणुन विजयी होतात. आज परिस्थितीत राज्य विधिमंडळातील ते सर्वात जेष्ठ आमदार आहेत. आपल्या आमदारकीच्या वीस वर्षाच्या व चालु पंचवार्षिकमध्ये दीड वर्षे असे जवळपास बावीस वर्षाच्याच्या आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी विकासाचा अनुशेष भरून काढत, मतदार संघ विकास प्रवाहात आणण्याचे मोठे कार्य केले.या सर्व राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रवासात त्यांना लहान भाऊ धैर्यशील काका सोळंके यांची कायमच साथ असते.काका हे लक्ष्मणाप्रमाणे मोठे रामा समान बंधु आ.दादा यांच्यासोबत राहुन त्यांना साथ देतात. शिवाय मुलगा चेअरमन विरेंद्र दादा व पुतन्या जयसिंह भैया यांचीही त्यांना कायमच साथ असते.विकासाची चौफेर दुरदृष्टी असलेल्या व विकासाची जाण असलेल्या आ.प्रकाश दादा सोळंके यांना वाढदिवसानिमित्त मन:पुर्वक खुप खुप हार्दिक शुभेच्छा.मतदार संघातील जनतेची सेवा करून, विकासाचा अनुशेष भरून काढण्यासाठी त्यांना दीर्घायुष्य लाभो हीच ईश्वर चरणी प्रार्थना...



सुरेश लगड,सचिव
लोकनेते सुंदररावजी सोळंके
साखर कारखाना,लि.सुंदर नगर.

# मनरेगा अंतर्गत मातोश्री ग्राम समृद्धी योजनेतील गैरव्यवहाराच्या विरोधात ऑल इंडिया पँथर सेनेचा आंदोलनाचा इशारा

## नितीन सोनवणे व कार्यकर्ते २० जानेवारी रोजी बिंदुसरा धरणात जलसमाधी घेणार

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत (मनरेगा) राबविण्यात आलेल्या मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते योजनेतील तांदळवाडी घाट ता. जि. बीड येथील खडीकरण रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणात ओव्हरलॅपिंग, बोगस कामे व गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप करीत ऑल इंडिया पँथर सेनाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.या प्रकरणी ऑल इंडिया पँथर सेना महाराष्ट्र प्रवक्ता तथा बीड जिल्हाध्यक्ष नितीन सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक ३१ डिसेंबर २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी, बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड तसेच मा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती बीड यांना लेखी स्वरूपात तक्रार देण्यात आली होती. मात्र, आजतागायत या तक्रारीकडे कोणत्याही प्रकारची दखल न घेतल्याने संतप्त झालेल्या नितीन सोनवणे व असंख्य कार्यकर्त्यांनी दिनांक २० जानेवारी २०२६ रोजी मोजे पाली येथील बिंदुसरा धरण या ठिकाणी जलसमाधी घेण्याचा ठाम निर्णय जाहीर केला आहे.नितीन सोनवणे म्हणाले, शेतकऱ्यांच्या विकासासाठी राबविलेल्या या महत्त्वाच्या योजनेतून शेतापर्यंत पोहोचणाऱ्या पाणंद रस्त्यांच्या कामात भ्रष्टाचार करून गरीब कामगारांचे पैसे खाल्ले गेले. शासनाच्या यंत्रणांनी त्वरित कारवाई न केल्यास आम्ही आमच्या प्राणांची बाजी लावण्यास तयार आहोत. ही केवळ धमकी नसून, अन्यायाविरुद्धचा लढा आहे.या आंदोलनामुळे बीड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील विकास कामांमधील पारदर्शकता व जबाबदारीवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. स्थानिक प्रशासनाकडून याबाबत लवकरात लवकर कारवाई होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे, अन्यथा मोठ्या प्रमाणात आंदोलन होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# निवडणुका कधीही होऊ द्या;मी जनतेच्या सेवेत सदैव तत्पर-राजेंद्र मस्के

## विकास आणि जनविश्वासाच्या बळावर मला विजयाची खात्री!

दैनिक वादळ वार्ता
**बीड । प्रतिनिधी**

आज राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी लिंबागणेश जिल्हा परिषद गटातील मौजे करचुंडी येथील शिंदे वस्तीला भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी आपल्या सेवाभावी कार्याचा आढावा घेत जनतेचा विश्वास असल्याने आगामी निवडणुका कधीही झाल्या तरी विजय निश्चित असल्याचा विश्वास व्यक्त केला.मी सदैव जनतेच्या थेट संपर्कात आहे. एक फोन आला तरी मी तत्काळ प्रतिसाद देतो आणि अडचणी सोडवण्यासाठी स्वतः पुढाकार घेतो. जनसेवेतुन माझं राजकारण आहे. निवडणुकीची मला चिंता नाही, कारण माझं बळ हे जनतेचं प्रेम आणि



विश्वास आहे, असं मस्के यांनी सांगितलं. राज्यातील बारा जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका जाहीर झाल्या असल्या तरी बीड जिल्ह्याची निवडणूक पुढे ढकलण्यात आली आहे. मस्के यांनी सांगितलं की, निवडणुका आज झाल्या किंवा पुढे कधी ही झाल्या, तरी मी जनसेवेसाठी ३६५ दिवस तत्पर असतो. माझं कार्यच माझा प्रचार आहे. काही लोक निवडणुका जवळ आल्या की पावसाळी छत्र्याप्रमाणे उगवतात आणि मतदारांना प्रलोभन दाखवतात. पण सजग मतदार अशा लोकांवर विश्वास ठेवत नाहीत. जनतेला माझा सेवाभाव आणि विकासाची कृतिशीलता अनुभवायला मिळाली आहे, त्यामुळे विजय माझाच होणार हे निश्चित आहे.करचुंडी येथील शिंदे वस्ती,मोरगाव जाधव वस्ती रस्ता, मुळूकवाडी ते तवले वस्ती पांदण रस्ता अशा वाड्या वस्त्यांना रस्त्याची कामे पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील आहे .लिंबागणेश जिल्हा परिषद गटात केलेल्या विविध विकासकामांमुळे आणि लोकांशी सातत्याने जोडलेल्या संवादामुळे राजेंद्र मस्के यांच्यावरील जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचं चित्र या भेटीतून स्पष्ट दिसून आलं.

# आमच्या वंशाला दिवा नाही म्हणत छळलं,विवाहितेची गळफास घेऊन आत्महत्या

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

तुला तीन मुलीच झाल्या आमच्या वंशाला दिवा नाही,अशी सतत हिणवणूक करत शारीरिक व मानसिक छळ सहन करावा लागत असल्याने अरुणा उद्धव ठोंबरे नामक २५ वर्षीय विवाहितेने फॅनला साडीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना केज तालुक्यातील उंदरी येथे घडली.या प्रकरणी पती, सासू व सासऱ्यांविरोधात युसुफवडगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लातूर जिल्ह्यातील आजरखेडा ता.रेणापूर येथील प्रकाश सूर्यवंशी यांची मुलगी अरुणा हिचा विवाह १६ ऑगस्ट २०१९ रोजी केज तालुक्यातील उंदरी येथील उद्धव ठोंबरे याच्याशी झाला होता. विवाहाच्या वेळी उद्धव ठोंबरे बँकेत नोकरीस होता, मात्र नंतर त्याने नोकरी सोडून शेती व्यवसाय सुरू केला.या दाम्पत्याला राजनंदिनी वय ५ तसेच आर्या व अपूर्वा वय ४ अशा जुळ्या मुलींसह एकूण तीन मुली आहेत.तीन मुली झाल्याच्या कारणावरून पती उद्धव ठोंबरे दारूच्या नशेत अरुणाला शिवीगाळ व मारहाण करीत असल्याचा आरोप नातेवाइकांनी केला आहे. तसेच सासू इंदूबाई ठोंबरे व सासरे उत्तम ठोंबरे हे आम्हाला मुलगा हवा होता तू आमचा वंश बुडविलास, असे म्हणत तिला मानसिक त्रास देत होते.या छळाबाबत अरुणा ठोंबरे हिने वेळोवेळी आई-वडील, भाऊ गोविंद सूर्यवंशी तसेच मोठी बहीण करुणा यांना फोनवरून




तसेच माहेरी आल्यानंतरमाहिती दिली होती.सासरच्या छळामुळे तिला सासरी नांदण्याची इच्छा नसल्याचे ती वारंवार व्यक्त करीत होती.मात्र माहेरच्या मंडळींनी तिची समजूत काढून तिला धीर देण्याचा प्रयत्न केला.

अखेर सततच्या छळाला कंटाळून अरुणा ठोंबरे हिने १० जानेवारी रोजी दुपारी सुमारे २ वाजता उंदरी येथील राहत्या गळफास घेऊन आत्महत्या केली.या प्रकरणी मयत अरुणाचा भाऊ गोविंद सूर्यवंशी यांच्या तक्रारीवरून युसुफवडगाव पोलीस ठाण्यात पती उद्धव ठोंबरे, सासू इंदूबाई ठोंबरे व सासरे उत्तम ठोंबरे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक मच्छिंद्रनाथ शेंडगे यांच्या मार्गदर्शना खाली पोलीस उप निरीक्षक भारत बरडे हे पुढील तपास करीत आहेत.आईच्या अकाली जाण्याने तिन्हीचिमुकल्या मुलींचे भवितव्य उघड्यावर आले आहे.

# गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,चौसाळा येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

गुरुदत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, चौसाळा ता.जि. बीड या शाळेत राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे सुरवातीला राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री चौधरी सर यांच्या हास्ते पुष्पहार अर्पण करून पुजन करण्यात आले.त्यानंतर कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.चौधरी सर होते. शाळेतील इ.पाचवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद या महापुरुषांच्या जीवनावर व कर्तृत्वार आधारित मोठ्या उत्साहात भाषणे केली.शाळेतील इ.सातवी मधील विधार्थिनीं कु. गुरव कल्याणी सुंदर हिने मी जिजाऊ बोलतेय हि एकांकिका श्रीमती साबणे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री घोडके सर, मोटे सर, श्रीमती साबणे मॅडम, जाधव मॅडम, गुरव सर, लिमकर सर यांनीही या महापुरुषांच्या जीवनावर आधारित विद्यार्थींना माहिती दिली. अध्यक्षीय भाषणात शाळेचे मुख्याध्यापक श्री.चौधरी सर यांनी स्वामी विवेकानंद यांच्या जीवनावर प्रकाश टाकताना विवेकानंदांना किती कुशाग्र बुद्धी होती.हे वाचनालयातील प्रसंगावरून व शिकागो येथील धर्म परिषदेत विवेकानंदांनी केलेल्या भाषणातुन माझा हिंदु धर्म कसा सर्व श्रेष्ठ आहे हे जगाला पटवून दिले. तसेच राजमाता जिजाऊ यांच्या विषयी माहिती देताना जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वर लहान वयातच स्वराज्या विषयी योग्य ते संस्कार करून अन्याय, अत्याचार विषयी चिड निर्माण केली.त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज यांनी राजमाता जिजाऊ यांच्या मार्गदर्शनाखाली आदर्श स्वराज्याची स्थापना करून सर्वांना भयमुक्त केले. कार्यक्रमाचा शेवट पसायदान व जिजाऊ वंदना घेऊन करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पवार सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री मोटे सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील कर्मचारी श्री बाळासाहेब जाधव, श्रीमती टाचतोडे बाई, धनंजय वाघमारे, विनायक तांदळे, इंद्रजित भोसले विश्वनाथ पवार यांनी परिश्रम घेतले.



# अल्पभूधारक महिला शेतकरी अनुसया गर्जे यांनी फुलवला सेंद्रिय शेतीचा मळा

दैनिक वादळ वार्ता
कंधार । धोंडीबा मुंडे

कंधार तालुक्यातील तळयाचीवाडी येथील महिला शेतकरी सौ.अनुसया गोविंद गर्जे यांनी स्वयंशिक्षण प्रयोग यांच्या मार्गदर्शनातून सेंद्रिय शेती , कंपोस्ट खत,शून्य खर्च्यातून दशपर्णी व जीवामृत तयार करून ते स्वतःच्या एक एकर शेतात त्याचा वापर करत ते मॉडेल आपल्या शेतामध्ये यशस्वी वापर करून रसायन मुक्त, विषमुक्त शेती करत आहेत. त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून नारी ही आहे प्रत्येक क्षेत्रात भारी आहेच हे त्यांनी सिद्ध केल्याचे बोलले जात आहे.

अनुसया गर्जे यांनी कृषी विभागामार्फत खरीप हंगामपुर्व/रब्बी हंगाम अढावा बैठक तथा बिजप्रक्रीया व बिज उगवन क्षमता चाचणी प्रात्यक्षिक मागेल त्याला शेततळे, म.ग्रा.रो.ह.यो अंतर्गत विविध योजनांची माहिती घेतली व भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजना, कृषि यांत्रिकीकरण, प्रधानमंत्री सुक्ष्मसिंचन योजना, माती नमुने तपासणी, विवीध पिकांची लागवड पध्दती आदिंबाबत ही सविस्तर माहीती घेऊन त्यांनी घरीच दशपर्णी अर्क औषध व जीवामृत सारखे औषध तयार करून त्यांनी गहू, हरभरा, भोईमूग, ज्वारी, भाजीपाला



आदी पिकांवर त्याचा वापर केला. त्यामुळे त्यांचा कीटक नाशकावर होणारा खर्च वाचला व शेतीतील मातीही. आधुनिक काळात पारंपरिक ज्ञान व नैसर्गिक घटकावर आधारित शेती कसण्याच्या पद्धतीस शेद्रीय शेती म्हणून ओळखले जाते. मानवास काम करण्यासाठी लागणारी दैनंदिन ऊर्जा ही शेती क्षेत्रातून निर्माण झालेल्या अन्न पदार्थातूनच मिळते. म्हणजे सकस व पौष्टिक आहार ,परिपूर्ण जीवनसत्त्वाची गरज शेतीतून निर्माण झालेल्या उत्पादन मुळे भागते. असे प्रतिपादन सौ अनुसया गर्जे यांनी व्यक्त केले.

> वरील यशाचे गमक व मार्गदर्शन सौ. रेवतीताई कानगुले तालुका समन्व्यक( एस.एसपी ) सौ. पानपट्टे ताई कृषी सहाय्यक श्री गोविंद गर्जे व्हॉइस चेअरमन सेवा सहकारी सोसायटी व गावातील सर्व महिला यांना जाते.

> कंधार तालुक्यातील तळयाचीवाडी येथील शेतकरी महिलेने स्वयंशिक्षण प्रयोगाच्या माध्यमातून सेंद्रिय शेती करत नारी ही आहे प्रत्येक क्षेत्रात भारी हे सिद्ध केले.

## जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत जनार्थचे वर्चस्व; मति मंद प्रवर्गाचे सांघिक विजेतेपद सलग १४ व्यांदा



दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

अंबाजोगाई येथे दि. ७, ८ व ९ जानेवारी २०२६ रोजी पार पडलेल्या जिल्हास्तरीय दिव्यांग मुला-मुलींच्या क्रीडा स्पर्धेत जनार्थ शिक्षण प्रसारक मंडळ, येळंब (घाट) ता. जि. बीड संचलित मतिमंद निवासी विद्यालय, उमरी (ता. केज) येथील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करत मतिमंद प्रवर्गाचे सांघिक विजेतेपद सलग १४ वेळेस पटकावले. या ऐतिहासिक यशामुळे संस्थेचा व शाळेचा नावलौकिक वाढला आहे.स्पर्धेत विविध वयोगटांतील विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत पदकांची लयलूट केली. ८ ते १२ वयोगटात स्पॉट जंपमध्ये कु. सारिका श्रीराम चौरे व चि. श्रावण राम काळे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. ५० मीटर धावण्यात चि. श्रावण राम काळे प्रथम, तर सॉफ्टबॉल थ्रोमध्ये चि. ऋषिकेश पांडुरंग सोळंके प्रथम आले.१७ ते २१ वयोगटात कु. भक्ती विश्वास शेटे यांनी गोळा फेक व १०० मीटर धावण्यात प्रथम क्रमांक मिळवला. २०० मीटर धावण्यात कु. सोनाली तानाजी कांबळे प्रथम ठरल्या. यासह अनेक विद्यार्थ्यांनी द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवत संघाच्या यशात मोलाचा वाटा उचलला.या घवघवीत यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष श्री. विकासराव कदम, मुख्याध्यापिका जाधव मॅडम यांनी क्रीडा शिक्षक सुरवसे सर तसेच सर्व दिव्यांग खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या मेहनतीला योग्य मार्गदर्शन मिळाल्यामुळेच हे सातत्यपूर्ण यश शक्य झाल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

## रमेश तात्या गालफाडे यांच्या वाढदिवसानिमित्त स्वामी समर्थ वृद्धाश्रमात आजी-आजोबांना अल्पोहार व फळ वाटप



दैनिक वादळ वार्ता
केज । प्रतिनिधी

स्वामी समर्थ वृद्धाश्रमा तील आजी-आजोबांना केज तालुका कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने अल्पोहाराचे व फळांचे वाटप करण्यात आले.
बहुजन विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते रमेश तात्या गालफाडे यांचा वाढदिवस केज शहरा मध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. केज तालुका कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने रमेश तात्या गालफाडे यांच्या वाढदिवसानिमित्त केज शहरा लगत बोबडेवाडी रोडवरील असणाऱ्या स्वामी समर्थ वृद्धाश्रम या ठिकाणी अल्पोपहार व फळांचे वाटप करून रमेश तात्या गालफाडे यांचा वाढदिवस हा वृद्धाश्रमातील आजी- आजोबा यांच्या समवेत साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करत संयुक्त जयंती साजरी करण्यात आली.स्वामी समर्थ वृद्धाश्रमाला कुठलेही शासनाचे अनुदान नसताना महादेव बापू कराड हे सध्या स्वखर्चाने हे वृद्ध आश्रम चालवतात कुठल्याही शासनाची सवलत नाही किंवा कसलाही आधारनसताना वृद्धाश्रम चालवतात या वृद्धाश्रमात एकूण नऊ महिला व चार पुरुष आहेत.यांचा सर्व खर्च दवाखान्याचा असेल किंवा इतर कुठलाही खर्च महादेव बापू कराड हे स्वतः करतात.कला क्रीडा विश्व समितीच्या वतीने या वृद्धाश्रमामध्ये फळाचे व अल्पोहाराचे वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी कला क्रीडा विश्व समितीचे अध्यक्ष अनिल वैरागे,उपाध्यक्ष मुनीर कुरेशी,ज्येष्ठ नागरिक बिबीशन ठोंबरे,धनराज भालेराव,उमाकांत बोधने, सिंधुताई मुळे,सुनिताताई बोधने तसेच गावकरी मंडळी हे देखील यावेळी उपस्थित होते.महादेव बापु कराड व आजी आजोबा यांनी रमेश तात्या गालफाडे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या व आभार व्यक्त केले आहेत.

# जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वात तीन पिढ्यांची ऊर्जा-प्रा.इंद्रजित भालेराव

## जिजाऊ जयंतीनिमित्त तुलसी समूहातर्फे 'सायकल बँक' या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात; २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप

दैनिक वादळ वार्ता
बीड । प्रतिनिधी

जिजाऊ ज्या कुळात जन्माला आल्या, त्या तीन पिढ्यांमध्ये त्या एकमेव स्त्री होत्या. ना आत्या, ना बहीण, ना मुलगी जणू तीन पिढ्यांची संपूर्ण स्त्रीशक्ती जिजाऊंच्या व्यक्तिमत्त्वात एकवटली होती. त्याच ऊर्जेतून छत्रपती शिवाजी महाराजांसारखा नररत्न घडला, असे भावस्पर्शी काव्यात्मक विवेचन प्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजित भालेराव यांनी केले.राजमाता जिजाऊ माँसाहेब यांच्या जयंतीनिमित्त तुलसी शैक्षणिक समूह, बीड यांच्या वतीने आयोजित व्याख्यान-काव्य मैफिलीत ते बोलत होते. हा कार्यक्रम तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड नालंदा फाउंडेशनचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक मा. गणेश वाघ, मा.सोपानराव धुलगुंडे, मा.गणेश सामाले, डॉ.विजयकुमार बांदल, डॉ.अश्विनी बेद्रे, प्रा.डी.जी. निकाळजे, प्रा.डी.डी. राऊत, प्रा.प्रकाश ढोकणे तसेच सौ.उमा जगतकर उपस्थित होते.प्रा.भालेराव



यांनी जिजाऊंच्या जीवनावर आधारित विविध काव्यगाणी सादर करून उपस्थितांना भावनिक केले. 'आधी घडवा चरित्र आपुले, मगच घ्या छत्रपतीचे नाव' या ओळींतून जिजाऊंच्या संस्कारांची आणि शिवरायांच्या घडणीत त्यांच्या भूमिकेची प्रभावी मांडणी केली. जिजाऊंच्या जन्मापासून ते शिवाजी महाराजांच्या घडणीतल्या योगदानापर्यंतचा संपूर्ण प्रवास त्यांनी काव्यरूपाने उलगडला.
प्रमुख पाहुणे गणेश वाघ यांनी जिजाऊंच्या कार्याचा गौरव केला, तर अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी मुलींच्या सक्षमीकरणावर भर दिला. त्यांनी सांगितले की, मुलींची ओळख स्वतःच्या कर्तृत्वावर असली पाहिजे. सावित्रीमाई, जिजाऊ, अहिल्यामाता, माता रमाई, फातिमा शेख यांची ओळख त्यांच्या कार्यामुळे आहे. तशीच ओळख आपल्या मुलींनी घडवली पाहिजे. यासाठी स्किल आणि विल या दोन गोष्टी अत्यावश्यक आहेत, असे अधोरेखित केले.या कार्यक्रमात जिजाऊ जयंतीचे औचित्य साधून प्रा.प्रदीप रोडे यांच्या संकल्पनेतून मुलींच्या सक्षमीकरणासाठी 'सायकल बँक' या नाविन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली. पहिल्या टप्प्यात २५ विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात आले असून, हा उपक्रम टप्प्याटप्प्याने इतर गरजू मुलींपर्यंत पोहोचवण्यात येणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अश्विनी बेद्रे, सूत्रसंचालन प्रा. अंकुश कोरडे, तर आभार डॉ. विकास वाघमारे यांनी मानले. संस्थेच्या विविध शाळा व महाविद्यालयांचे प्राचार्य, पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तळोदा पालिकेत सत्ताधाऱ्यांची सरशी; उपनगर अध्यक्षपदी राष्ट्रवादीच्या शितल पाडवी विजयी

## भाजप-सेना युतीचे हितेंद्र क्षत्रिय आणि राष्ट्रवादीचे गिरधर सागर स्वीकृत नगरसेवकपदी बिनविरोध

## केवळ १ मताच्या फरकाने उपनगराध्यक्षपदाचा निकाल; युतीमुळे विरोधकांचे संख्याबळ १० वर

दैनिक वादळ वार्ता

तळोदा नगरपालिकेत आज दिनांक १३ रोजी उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक निवडीच्या निमित्ताने प्रचंड राजकीय खळबळ पाहायला मिळाली. अत्यंत अटीतटीच्या झालेल्या या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या (अजित पवार गट) शितल लक्ष्मण पाडवी यांनी केवळ १ मताच्या फरकाने विजय मिळवत उपनगराध्यक्ष पद काबीज केले. दुसरीकडे, स्वीकृत नगरसेवक पदासाठी भाजप-सेना युतीचे हितेंद्र क्षत्रिय आणि राष्ट्रवादीचे गिरधर सागर यांची बिनविरोध निवड झाली आहे. उपनगराध्यक्ष पदासाठी सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेस गटाकडून शितल पाडवी आणि विरोधी भाजप-शिवसेना युतीकडून मोनिका सूरज माळी यांच्यात थेट लढत झाली. हात उंचावून झालेल्या मतदान प्रक्रियेत शितल पाडवी यांना ११ मते मिळाली, तर मोनिका माळी यांना १० मते पडली. अवघ्या एका मताच्या फरकाने पाडवी यांनी विजय मिळवला, ज्यामुळे सत्ताधारी गटात उत्साहाचे वातावरण आहे.स्वीकृत नगरसेवक पदासाठी युतीकडून शिवसेना शिंदे गटाचे हितेंद्र क्षत्रिय यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची निवड बिनविरोध घोषित करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरुवातीला प्रभाकर उगले, गिरधर सागर आणि अभिजित कलाल अशा तिघांनी अर्ज भरले होते. मात्र, पक्षीय समन्वयानंतर उगले आणि कलाल यांनी माघार घेतल्याने गिरधर सागर यांची बिनविरोध निवड झाली. या निवडीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) यांची झालेली युती. शिवसेनेचे ६ आणि भाजपचे ४ असे एकूण १० नगरसेवक आता एकत्र आले आहेत. या नवीन समीकरणामुळे पालिकेतील विरोधी गट अधिक भक्कम झाला असून, आगामी काळात समित्यांच्या निवडीत आणि पालिकेच्या कामकाजात या युतीचा मोठा वरचष्मा राहणार असल्याचे चिन्हे आहेत.आता आमच्याकडे १० नगरसेवकांचे भक्कम पाठबळ आहे. शहराच्या प्रलंबित विकासकामांसाठी आणि पालिकेतील चुकीच्या निर्णयांविरुद्ध भाजप-शिवसेना युती आता अधिक आक्रमकपणे रस्त्यावर उतरेल.असे अनुप उदासी व अजय परदेशी (गटनेते, भाजप-सेना युती)यांनी सांगितले आहे.शहर विकासासाठी आम्ही विरोधी गटालाही विश्वासात घेऊ. उपनगराध्यक्ष आणि स्वीकृत नगरसेवक पदे दरवर्षी फिरती ठेवून जास्तीत जास्त कार्यकर्त्यांना संधी देण्याचे आमचे धोरण राहील.असे लोकनियुक्त नगराध्यक्ष भाग्यश्री चौधरी यांनी सांगितले.ही संपूर्ण निवड प्रक्रिया पीठासीन अधिकारी तथा नगराध्यक्षा भाग्यश्री चौधरी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. त्यांना मुख्याधिकारी विक्रम जगदाळे आणि कार्यालय अधीक्षक कमलेश काळे यांनी सहकार्य केले.







# सरपंचाने लाज सोडली : चक्क उपसरपंचा कडूनच मागितली ७० हजाराची लाच!

## वैक्तिक लाभाच्या जलसिंचन विहीर मंजूर करण्यासाठी ७० हजाराची लाच घेताना सरपंच रंगेहात पकडला

**दैनिक वादळ वार्ता**
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील एका सरपंचाने उपसरपंच आणि इतर तिघांना मनरेगा योजने अंतर्गत जलसिंचन विहीर मंजूर करण्यासाठी गटविकास अधिकारी आणि इतराना देण्यासाठी प्रत्येकी २५ हजार रु. लाच मागितली होती. त्या पैकी ७० हजार रु. घेताना लाचखोर सरपंचाला लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा रचून रंगेहात ताब्यात घेतले.या बाबतची माहिती अशी की, केज तालुक्यातील तरनळी येथील सरपंच महादेव महादेव प्रताप खेडकर यांनी उपसरपंच आणि इतर तिघे अशा चौघांच्या शेतात मनरेगा योजने अंतर्गत जलसिंचन विहिरी मंजूर करण्यासाठी गटविकास अधिकारी आणि सबंधित अधिकारी यांना लाच म्हणून प्रत्येकी २५ हजार रु. ची म्हणजे एकूण एक लाख रु. ची मागणी केली होती. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने त्यांनी धाराशिव येथील लाचलुचपत विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि तक्रार दिली. तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक २३ व२४ डिसेंबर २०२५ रोजी पडताळणी करण्यात आली.

दरम्यान सरपंच महादेव खेडकर याने चौघांना ७० हजार रु. घेऊन येण्याचे सांगितले. त्या नुसार लाचलुचपत पथकाचे पोलिस निरीक्षक विजय वगरे आणि त्यांच्या पथकातील पोलिस हेडकॉन्स्टेबल जाधव, पोलिस हेडकॉस्टेबल करडे, पोलिस कॉन्स्टेबल तावस्कर, पोलिस कॉन्स्टेबल हजारे यांनी सापळा रचला. दि. १३ जानेवारी रोजी उसरपंच यांनी केज येथील.पंचायत समितीच्या पाठीमागे असलेल्या सरपंच यांच्या खोलीत त्यांना ७० हजार रु. लाच दिली. त्याने लाच स्वीकारताच खून करताच पोलिस निरीक्षक विजय वगरे आणि त्यांच्या पथकाने लाचखोर सरपंच महादेव खेडकर याला रंगेहात ताब्यात घेतले. त्या नंतर सरकारी पंचासमक्ष त्याची झडती घेतली.

या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलिस निरीक्षक विजय वगरे यांच्या फिर्यादी वरून लोकसेवक सरपंच महादेव खेडकर याच्या विरुद्ध केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १ जानेवारी रोजीच सरपंच अडकला अससता सापळ्यात ! :- लाचखोर सरपंच हा नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी लाच स्वीकारताना सापळ्यात अडकला असता पण त्याने त्या दिवशी पैसे स्वीकारले नाहीत म्हणून वाचला होता.




## साबला येथील आदर्श सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



साबला ता.केज येथील ग्रामपंचायत आदर्श सरपंच सौ.जनाबाई नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त साबला येथे शालेय साहित्य वाटप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.रविवार दि.११ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गट साधन केंद्र केजचे गटशिक्षण अधिकारी श्री.सुनील केंद्रे होते तर प्रमुख उपस्थिती मध्ये शिवाजीराव रोडे, पत्रकार डी.डी.बनसोडे, संतोष गालफाडे,अजय भांगे,चंद्रकांत पाटील, दशरथ चवरे,मुब्बशीर खतीब,दत्तात्रय मजमुले, दिनकर जाधव,रविंद्र मेटे, शिव शाहिर बंडु खराटे, शेख अजिमोद्दीन,वली तांबोळी श्रीमती ज्योती सांबरे आदी मान्यवर उपस्थित होते.या उपक्रमा अंतर्गत गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले.याप्रसंगी प्रमुख पाहुणे डी.डी.बनसोडे सर यांनी सरपंच सौ.जनाबाई काकडे यांच्या साबला येथील सरपंच पदाच्या काळात केलेल्या कामाची प्रशंसा केली,वाढदिवसा च्या शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय समारोपात गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,मुलगी शिकली पाहिजे त्यामुळेच शासनाने मुलींचे शिक्षण मोफत केले आहे.मुलीचे वर अठरा वर्षे होईपर्यंत लग्न करु नका,बाल विवाह आपल्या भागात होत असल्याचे दिसून आले तर त्वरीत कळवावे.

यावेळी सरपंच सौ. जनाबाई काकडे व आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांचा सत्कारमान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवशाहीर बंडु खराडे यांनी पोवाडा सादर करीत उपस्थितांची मने जिंकली.श्रीमती ज्योतीताई सांबरे व वली तांबोळी यांनीसौ.जनाबाई काकडे यांचा सत्कार केला.या कार्यक्रमासाठी उपस्थित उप सरपंच सौ. कचराबाई सरवदे,ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,आदर्श शिक्षक सुधीर नाईकनवरे,हनुमंत कटारे,उमाशंकर शिंदे, गणेश कटारे,लखनराऊत, राहुल मुळे,विजयसिंह काकडे,हनुमंत काकडे, रामराजे काकडे,आकाश काकडे,रामराजे शिंदे, रामभाऊ काकडे,हनुमंत परळकर,नजीर काझी, फोटोग्राफर लखन कटारे नेहाल काझी,शिवाजी नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,हनुमंत नाईकनवरे,श्रीमंत नाईकनवरे,महादेव नाईकनवरे,लक्ष्मण मुळे यांच्यासह गावातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन लक्ष्मण काकडे यांनी केले तर आभार नरहरी काकडे यांनी मानले.

## हिंदराष्ट्र संघाच्या उपाध्यक्षा सौ.राधाताई सपकाळ श्री.बाळासाहेब सपकाळ यांनी केला सौ.ज्योतीताई पाटील कु.ॲड.स्नेहल पाटील यांचा सत्कार

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



हिंदराष्ट्र संघाच्या महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षा सौ. राधाताई सपकाळ व श्री. बाळासाहेब सपकाळ यांनी पत्रकार चंद्रकांत पाटील यांच्या निवास स्थानी सदिच्छा भेट घेऊन सत्कार केला.यावेळी ॲड.स्नेहल पाटील यांनी ऑल इंडिया बार एक्झामिनेशन यशस्वी रित्या उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कायद्याच्या क्षेत्रात मिळवलेले हे यश प्रेरणादायी असून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

तसेच सौ.ज्योतीताई पाटील यांची महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ,मुंबई केज तालुका महिला अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहिता साठी भरीव कार्य करण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली.या सदिच्छा भेट व सत्कार प्रसंगी सामाजिक, कायदे विषयक व पत्रकारिता क्षेत्रात कार्य करणाऱ्या महिलांच्या योगदानाचे कौतुक करण्यात आले. केकतसारणी या गावचे सपकाळ व पाटील परिवार भुमीपुत्र आहेत त्यामुळे केकतसारणी गावकऱ्यांच्या वतीने केलेला सत्कार अमुल्य आहे अशी प्रतिक्रिया सत्कार मुर्ती यांनी व्यक्त केली या छोटेखानी कार्यक्रमामुळे घरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.पाटील परिवाराच्या वतीने सपकाळ परिवाराचे आभार व्यक्त करण्यात आले आहेत.

## स्वराज्य जननी राजमाता जिजाऊंचा आज ४२८वा जन्मोत्सव सोहळा व राष्ट्रीय युवा दिन उत्साहात साजरा

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**



बुवासाहेब पाटील माध्य. व उच्च माध्य.विद्यालय, शिंदी येथे राजमाता जिजाऊ यांचा ४२८ वा जन्मोत्सव व स्वामी विवेकानंद जयंती – युवा दिन दोन्ही संयुक्त कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आले. या विशेष प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य सदाशिव मुंडे होते . त्यांनी युवकाना प्रेरणा व जिजाऊंचा आदर्श देऊन प्रोत्साहन दिले तसेच जिजाऊ माँ साहेब यांच्या कार्याचा गौरवपूर्ण आढावा घेतला. प्रा . शब्बीर शेख , प्रा . सुशिल राऊत ,प्रा . रामेश्वर चटप ,

प्रा . शिरीष भाकरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले . तसेच सिताराम चौरे,अशोक वाघमोडे, प्रकाश जोगदंड ,विनायक घोळवे, हरिभाऊ कांबळे यांनी सखोल व्याख्यान दिले. त्यांनी स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरक विचारांची आजच्या काळातील महत्त्वपूर्ण आवश्यकता स्पष्ट केली.

कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ व विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून झाली. प्रमुख पाहुणे जाधव सर , रामेश्वर हांगे यांनी कार्यक्रमाच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इयत्ता दहावी ची विद्यार्थीनी कु आपेक्षा मनसुके हिने केले. तसेच सुत्र संचालन कु . ऋतुजा जाधव हिने केले तर आभार प्रदर्शन प्राची पोपळे हिने केले. याप्रसंगी , मंचावर माता जिजाऊ च्या वेषभूषा केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी उपस्थित होत्या.

## चांगले कर्तव्य करा, तेच आयुष्यभर सोबत येते–शिभप शिवानंद महाराज दापशेडकर

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिलोळे**



जुना लोहा येथे कै. डॉ. सखाराम देवराव पा. शेटे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित शिवकिर्तनात सुप्रसिद्ध किर्तनकार शिभप शिवानंद महाराज दापशेडकर यांनी समाजप्रबोधन करताना चांगले कर्तव्य करा, तेच खऱ्या अर्थाने आयुष्यभर सोबत येते, असे प्रतिपादन केले. शेटे परिवाराच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात शिवकिर्तनासह महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी नगराध्यक्ष शरद पाटील पवार, उपनगराध्यक्ष करीम शेख, सिनेट सदस्य डॉ. नवनाथ (बापू) चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष दत्ता वाले, गटनेते भास्करराव पाटील पवार, तसेच अनेक नगरसेवक, मान्यवर नागरिक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किर्तनातून बोलताना महाराजांनी बसव अण्णांचे विचार मांडत, आपल्याकडे जे आहे ते इतरांशी वाटायला शिका, जातीभेद विसरा, समाजातील प्रत्येकाला मदत करा, असे सांगितले. कुटुंबसंस्कार, आई–वडिलांची सेवा, प्रामाणिक श्रम आणि योग्य मार्गाने धनार्जन यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. जीवन हे क्षणभंगुर असून, माणसाने सत्कर्म व भगवंताचे चिंतन करावे, असा संदेश त्यांनी दिला. कै. डॉ. सखाराम शेटे यांचे सामाजिक व वैयक्तिक कार्य प्रेरणादायी होते. त्यांच्या संस्कारांमुळेच त्यांची मुले आज समाजात सन्मानाने उभी आहेत, असे गौरवोद्गारही महाराजांनी काढले. कार्यक्रमानंतर महाप्रसादाने उपस्थित भाविकांनी लाभ घेतला.

## स्वराज्यनिर्मितीचा पाया घडविणाऱ्या राष्ट्रमाता जिजाऊ–सय्यद सज्जाद

**दैनिक वादळ वार्ता**
**पाटोदा । प्रतिनिधी**



चुंबळी येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले ,राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ ,शेख फातिमा व स्वामी विवेकानंद यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुणे सामाजिक कार्यकर्ते तथा सेवा सोसायटी संचालक सज्जाद भाई सय्यद यांनी विद्यार्थ्यांना जयंती विषयी बोलताना सांगितले की, राष्ट्रमाता माँसाहेब जिजाऊ सावित्रीबाई फुले शेख फातिमा यांचे विचार मुलींनी अंगीकृत करणे गरजेचे काळाची गरज आहे . स्वराज्य निर्मितीमध्ये राजमाता जिजाऊंचे अमूल्य योगदान राहिले शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले व त्यांच्या सोबत सहकारी शेख फातिमा यांनी परिश्रम घेतले. त्यांना आपण आदर्श स्थानी ठेवले पाहिजे, असे यावेळी सांगितले .यावेळी उपस्थित कार्यक्रमाचे अध्यक्ष कॉम्रेड महादेव नागरगोजे, ह. भ. प. पांडुरंग महाराज पवळ मुख्याध्यापक खाडे सर, क्रांतिसिंह नाना पाटील मुख्याध्यापक टेकाळे सर, चव्हाण सर, दराडे सर, नागरगोजे सर, कादरी सर, पवळ सर ,नाईकवडे सर, आरसूळ मॅडम ,नागरगोजे मॅडम व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते. वकृत्व स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थिनीने जास्तीत जास्त स्पर्धेमध्ये भाग घेतला होता. एकूण ४१ मुला मुलींचे भाषणे झाली. व त्याचे बक्षीस वितरण १५ जानेवारी रोजी होणार आहे असे कळविण्यात आले.या कार्यक्रमाचे संचलन जोगदंड सर यांनी केले. व कार्यक्रमाचे प्रास्ताविक टेकाळे सर यांनी केले शेवटी सर्वांचे आभार खाडे सर यांनी मानले.

## स्वामी विवेकानंद विद्यालयात विवेकानंद जयंती व राजमाता जिजाऊ जयंती संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**लोहा । राजकुमार पिलोळे**



सावरगाव नसरत येथील स्वामी विवेकानंद विद्यालयात 'युवा दिन' आणि 'राजमाता जिजाऊ जयंती' अत्यंत उत्साही वातावरणात साजरी करण्यात आली. भारतीय संस्कृतीचे जागतिक स्तरावर नेतृत्व करणारे स्वामी विवेकानंद आणि स्वराज्य जननी राजमाता जिजाऊ यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त विद्यालयात विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते स्वामी विवेकानंद आणि राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, पालक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून सावरगाव चे पोलीस पाटील भीमाशंकर बेद्रे सर तसेच नागोराव कदम, प्रल्हाद देवकते,शंकर कदम उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे प्रबोधन: याप्रसंगी बोलताना शाळेच्या मुख्याध्यापकांनी सांगितले की, स्वामी विवेकानंदांचे विचार तरुणांसाठी आजही प्रेरणादायी आहेत. त्यांनी जगाला दिलेला 'उठा, जागे व्हा आणि ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका' हा संदेश प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या जीवनात आचरणात आणला पाहिजे. तसेच, छत्रपती शिवाजी महाराज घडवणाऱ्या राजमाता जिजाऊंचे संस्कार आजच्या पिढीसाठी दिशादर्शक आहेत. असे आपल्या भाषणातून सांगितले. गायकवाड सरांनी युवा दिनाचे महत्त्व सांगून व्यसनमुक्ती वर गीत गायन केले.विविध उपक्रम: जयंतीनिमित्त विद्यालयातील विद्यार्थ्यांनी दोन्ही महापुरुषांच्या जीवनावर आधारित भाषणे केली. काही विद्यार्थ्यांनी वेशभूषा करून त्यांच्या विचारांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कपिल गोपचुडे यांनी केले, कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सोनवळे सर, चव्हाण सर, हानवते सर यांनी केले तर आभार प्रदर्शन कोपनर सरांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पूजा मॅडम,शिंदे मॅडम, व्यंकटकर मॅडम यांचे सहकार्य लाभले कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. या सोहळ्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये नवा उत्साह आणि प्रेरणा पाहायला मिळाली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077